## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र ६१२/२०२२/जळगाव**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. प्रविण रवींद्र सोनार,<br>रा. मु. गोळेगांव खुर्द, पो. पिंपळगांव,<br>ता. बोदवड, जि. जळगांव. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, गोळेगांव खुर्द.,<br>ता. बोदवड, जि. जळगांव. |

**सुनावणी दिनांक २३/०२/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक ०६/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २३/०२/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ०६/१२/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, तक्रारदार यांच्या दि.१४/०९/२०२२ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत माहिती न देणाऱ्या व दिशाभूल करणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार दंड व कलम २०(२) नुसार शास्तीची कारवाई करावी. दि. १४/०९/२०२२ च्या माहिती अर्जान्वये सन २०१२ ते २०२२ या कालावधीत ग्रुप ग्रामपंचायत गोळेगाव खुर्द यांना योजनानिहाय मिळालेल्या मानधन बाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती.

३) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, तक्रारदार यांचा दि. १४/०९/२०२२ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

३) आयोगासमोर उपलब्ध कागदपत्रे व युक्तीवाद विचारात घेता, तक्रारदार यांच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत कोणतीही माहिती/उत्तर दिलेले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्तीची कार्यवाही का करण्यात येवु नये याचा खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोळेगांव खुर्द, बोदवड यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी तात्काळ आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२) प्रस्तुत तक्रार क्रमांक ६१२/२०२२/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र ३१ -२९६३ 04 OCT 2024